# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २९८** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५२ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय** :- दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५२ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५२ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-२९९** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/६०६/२०२५-२६ दि.०१/०९/२०२५
३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.२५/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. निविदा समितीचा निर्णय.

**विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०८ मधील गट नं.११५/२ साईनगर ओपनस्पेस साईबाबा मंदिर व पशुपतीनाथ महादेव मंदिर येथे पेव्हर ब्लॉक व ओपन जिम साहित्य व सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख यांचे निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०८ मधील गट नं.११५/२ साईनगर ओपनस्पेस साईबाबा मंदिर व पशुपतीनाथ महादेव मंदिर येथे पेव्हर ब्लॉक व ओपन जिम साहित्य व सुशोभिकरण करणे कामास जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडील पत्र क्रं. नपा/नियोजन/नगरोत्थान योजना/१२८/२०२४ दि.१५/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि २७/११/२०२४ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.५६९ सन २०२४-२५ https://mahatenders.in वर प्रसिध्द केली असता ई निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०८ ई- निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असता त्यांची विस्तृत छाननी संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आली व पात्र अपात्र बाबत निर्णय होणे करीता निविदा समितीकडे रिपोर्ट सादर केले असता त्यावर कुठलाही निर्णय न झाल्याने सदरची ई-निविदा प्रसिध्द होवुन १२० दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्याने निविदा समिती यांचे सोबत झालेल्या चर्चे अंती निविदा संचातील पान नं. ५ वरील मुद्दा क्रं. १२ नुसार व शासन निर्णय क्रं. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ मधील पान नं. २१ वरील मुद्दा क्रं. ५.१.२ नुसार निविदेची विधी ग्राहता कालावधी १२० दिवस असल्याचे सुचित केलेले आहे त्यानुसार सदरची ई-निविदा रद्द करुन नव्याने फेर निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त यांनी दि. २३/०६/२०२५ रोजीचे मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.६०७ सन २०२५-२६ https://mahatenders.in वर प्रसिध्द केली आली असता ई निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०५ ई- निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. ०५ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची प्राथमीक छाननी केली असता. निविदा धारक हेमंत अरुण नाईक यांना अपात्र ठरविण्यात आले असुन खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन त्या नुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ४१८७११७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १. | विलास प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे दराने | ३७६८८२४/- |
| २. | शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख | निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दराने | ३३५०११२/- |
| ३. | संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी | निविदा रक्कमेपेक्षा १९.६६०% कमीचे दराने | ३३६३९३०/- |
| ४. | डी एच पाटील कंन्स्ट्रक्शन प्रोपा विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेपेक्षा ३.६६०% कमीचे दराने | ४०३३८६९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु ३३५०११२/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टीग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३३५०११२/- |
| ०२ | जि.एस.टी.१८% | ६०३०२०/- |
| ०३ | कामगार विमा १% | ३३५०१/- |
| ०४ | टेस्टीग चार्जेस | १३३०५/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ३४७५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ४००३४१३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ४०,०३,४१३/- मात्र आहे. परंतु मक्तेदार शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख यांचे निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार १ ते १० टक्के कमीचे दरा पर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतचा कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का व त्यावरील १६ ते त्यावरील टक्का पर्यंतचा कमीचे दरास प्रति टक्याला २ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख यांनी निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन १६% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.६,४०,५४६/- मात्रचा डि.डि.मनपा खजीन्यात सादर करण्या करीता व कामाची गुणवत्ता व कामाचा दर्जा कश्या प्रकारे चांगला राखणार आहे या बाबत मक्तेदार यांना पत्राद्वारे कळविले असता मक्तेदार यांनी मुदतित मनपा पावती क्रं.४१२८ दि. २५/०८/२०२५ रोजी रक्कम रु.६४०५४६/- मात्रचा डि.डी. क्रं. ००५२०५ रक्कम रु.६४०५४६/- मात्रचा जमा केलेला असुन त्यानुसार सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४०,०३,४१३/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. २८,०२,३८९/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत ७०% निधीतुन व याच योजनेतील मनपा हिस्सा ३०% रक्कम रु. १२,०१,०२४/- मात्र मनपा निधीतुन चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार शेख अब्दुल्ला नूर इकबाल शेख यांचे निविदा रक्कमेपेक्षा १९.९९०% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार स्थायी समिती /प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-३००** **दिनांक :- १६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./लेखा/५८९/२०२५-२६ दि.०३/०९/२०२५
३. प्रमुख लेखापाल, लेखा विभाग यांचा दि.२५/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांचा दि.०१/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०२/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजुरी देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

वार्षिक लेखा विवरण पत्रात नमूद केले प्रमाणे आरंभिची शिल्लक रक्कम रु.२६८,१३,७७,२५०/- व भाग अ व क ची एकुण जमा रक्कम रु.४३८,८३,२३,५३०/- असुन झालेला खर्च रक्कम रु.४३८,२६,३६,८५५/- इतका असुन वर्षा अखेर रक्कम रु.२६८,७०,६३,९२५/- मात्र इतकी शिल्लक आहे. तसेच भाग ब परिवहन विभागाचे जमा व खर्चाचे विवरण स्वतंत्र दाखवण्यात आले असुन त्यासह कुल एकुण रक्कम रु.७०७,०१,२१,१८७/- दाखविण्यात आली आहे. सदर शिल्लक रक्कमेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील शेअर्सची रक्कम रु.२८१,७८,१००/- मात्र समाविष्ट आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४(१) चे तरतुदीनुसार सदर हिशोब स्थायी समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे. परंतु सदयस्थीतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेची मुदत दि.१७/०९/२०२३ रोजी संपलेली असल्याने जळगांव शहर महानगरपालिकेचे प्रशासक या पदावर आयुक्त महानगरपालिका यांची शासनाच्या नगर विकास विभागाकडील आदेश एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, दि.१५/०९/२०२३ अन्वये नियुक्ती करण्यात आलेली असल्याने आयुक्त तथा प्रशासक यांचेकडेस सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे मान्यता मिळण्यासाठी मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-३०१** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/६५/२०२५-२६ दि.११/०९/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.२८/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.१९/०८/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ४५३० लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११८ दि.१९/०८/२०२५ अन्वये १२००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.३०/०५/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२० दि.१९/०८/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार स्थायी समिती/प्रशासक यांच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास स्थायी समिती / प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:-३०२** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/६७/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.१२/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२०/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.२५/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्र.MH-१९-M-७४७४ या वाहनाच्या दुरुस्ती कामी आलेले दर रक्कम रु.४७६४४/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार स्विकृत करण्यास मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

म.न.पा.सहा.आयुक्त (आरोग्य) कार्यालयाकडील प्रशासकीय वाहन क्र.MH-१९-M-७४७४ (स्विप्ट डिझायर) कार्यरत आहे. सदर वाहनाची दुरुस्ती करणे कामी सहा.आयुक्त (आरोग्य) कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी क्र.९८१३, ९८१४ दि.०२/०५/२०२५ अन्वये सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| | वाहन क्र.MH-१९-M-७४७४ (स्विप्ट डिझायर),(उत्पादीत वर्ष २०११) | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1. | PLUG ASSY OIL DRAIN | 19 | SERVICE KIT, OLD SWIFT DIESEL |
| 2. | LAMP ASSY, FOG | 20 | WIPER KIT (DR+AS) NEW WAGON R |
| 3. | LAMP UNIT RR COMBINATION RH | 21 | COOLANT PRMIX GREEN |
| 4. | LAMP UNIT RR COMBINATION LH | 22 | MGP RUST SMASH |
| 5. | BLADE ASSY WIPER DRIVER SIDE | 23 | GREASE, CLAPER ASSY |
| 6. | STRUT ASSY, FRONT SUSPN, R | 24 | SUPER CLEANER 480 |
| 7. | STRUT ASSY, FRONT SUSPN, L | 25 | SCREEN WASH 50 ML |
| 8. | MOUNT, FRONT STABILIZER BAR | 26 | MGDO (15W40)- MOBIL |
| 9. | WAIGHT, WHEEL BALANCE (5G) | 27 | REAR BREKE DRUM (ONE SIDE) |
| 10. | WAIGHT, WHEEL BALANCE (20G) | 28 | FRONT SUSPENSION ARM WITH OPPOSITE SIDE |
| 11. | WAIGHT, WHEEL BALANCE (30G) | 29 | REAR COIL SPRING (ONE SIDE) |
| 12. | ARM ASSY FRONT SUSPENSION R | 30 | OUT SIDE LABOUR |
| 13. | ARM ASSY FRONT SUSPENSION L | 31 | FRONT DISC BRAKE PAD (BOTH SIDE) |
| 14. | PAD ASSY SET | 32 | HEAD LAMP UINT OR HEADLAMP ASSY LAMP (ONE SIDE) WITH OPPOSITE SIDE |
| 15. | SLIDING PIN SET | 33 | FRONT FOG LAMP UNIT OR FRONT FOG LAMP ASSY (ONE SIDE) WITH OPOSITE SIDE |
| 16. | CABIN AIR FILTER SWIFT | 34 | FRONT STABILIZER BAR JOINT (ONE SIDE) WITH OPPOSITE SIDE |
| 17. | BRAKE FLUID GC1500AA (500ML PACK) | 35 | BATTERY EXIDE DIN65 LH |
| 18. | STRUT KIT SWIFT | 36 | - |

म.न.पा. वाहन क्र.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) हे वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता सहा.आयुक्त कार्यालयाकडे कार्यरत आहे. वाहनाचे वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी प्रमाणे या वाहनाची वरील प्रमाणे दुरुस्तीची कामे करणे कामी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स,जळगांव यांच्याकडील कोटेशन नं.ES२५००१०५८ दि.१०/०७/२०२५ व बॅटरीचे कोटेशन अन्वये दुरुस्ती करण्याकामी रक्कम रु.४७,६४४/- मात्र अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स,जळगांव यांना दुरुस्ती करणे कामी पुरवठा आदेश देणेस तसेच खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:-३०३** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/६८/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.२९/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०४/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महानगरपालिका प्रशासकीय विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (पेट्रोल) ६००० लिटर खरेदी करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका प्रशासकीय विभागाकरिता मारुती सुझुकी लि. कंपनीची MARUTI CIAZ SIGMA 1.5L MT-02 Nos, MARUTI FRONX SIGMA 1.2L MT-02 Nos, MARUTI GRAND VITARA SIGMA 1.5L MT-01 Nos, MARUTI SWIFT DZIRE 04 NOS असे एकूण ०९ नग नविन वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. ०९ प्रशासकीय वाहनांसाठी आर्थिक वर्ष-२०२५-२६ करिता ६००० लिटर्स पेट्रोल खरेदी कामी पंप ऑपरेटर यांची मागणी क्रं.१४११६ दि.१४/०८/२०२५ अन्वये वाहन विभागास प्राप्त झालेली आहे. यापुर्वी विभागा मार्फत पुरवठा आदेश क्र.४० दि.२९/११/२०२३ अन्वये ६००० लिटर (दि.२९/११/२०२३ ते १४/०२/२०२५ पावेतो) व पुरवठा आदेश क्र.२८ दि.१४/०२/२०२५ अन्वये ६००० लिटर (दि.१४/०२/२०२५ ते १५/०९/२०२५ पावेतो) असे एकुण १२००० लिटर पेट्रोल खरेदी करण्यात आलेले असुन दि.१५/०९/२०२५ पावेतो (२१ महीने कालावधी मध्ये) ९ वाहनांना वाटप करण्यात आलेले आहे.

त्यानूसार ९ वाहनांसाठी किरकोळ स्वरुपात पेट्रोल खरेदी करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता जळगांव शहरातील इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचेकडून किरकोळ दरात इंधन (पेट्रोल) खरेदी कामी प्रोफॉर्मा इनव्हास प्राप्त झालेले आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांना यापुर्वी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील मागणी नुसार आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच इंधन पुरवठा बाबत कोणतीही तक्रार नाही. महानगरपालिका प्रशासकीय विभागाकडील नविन वाहनांसाठी पेट्रोल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन पेट्रोल घेणे सोयीचे होईल. शासनाच्या धोरणानुसार दर कमी / जास्त झाल्यास त्या दरानुसार पेट्रोल खरेदी करण्यात येईल.

तातपुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (पेट्रोल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/१९ दि.१४/०८/२०२५ अन्वये ६००० लिटर पेट्रोल खरेदी कामी रक्कम रु.६,३३,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.६,३३,०००/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच इंधनाची मागणी व सदर वाहनाची इंधनाची गरज या बाबत खात्री करुन वाहन विभागाने इंधन पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र.:-३०४** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/७०/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.०४/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०४/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ डी.व्ही.८०४० (Tata Tigor EV XZ+) या वाहनाची दुरुस्ती करणेबाबत.

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ डी.व्ही.८०४० (Tata Tigor EV XZ+) वाहन हे उपायुक्त (सा.प्र.) या कार्यालयाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टसस्ह व मजुरीसह करणे कामी कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी क्रं.३२३४, दि.३०/०६/२०२५ व कार्यालयीन टिप्पणी वाहन विभागास दि.०१/०८/२०२५ रोजी प्राप्त झालेली आहे. मागणी व टिप्पणी अहवालानुसार वाहनाची तांत्रिक तपासणी केली असता AC चे काम लागणाऱ्या नविन स्पेअर पार्टसस्ह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकामी अधिकृत डिलर Ujjwal Auto Motives Pvt. Ltd. Jalgaon यांचे कडील Estimate प्रमाणे अंदाजे रक्कम रु.१४,५७२/- मात्रचे अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता वाहनाचे अधिकृत विक्रेता मे.उज्वल आटोमोटीव्ह प्रा.लि. यांना रक्कम रु.१४,५७२/- मात्रचा कार्यादेश देणेस मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच इंधनाची मागणी व सदर वाहनाच्या इंधनाची गरज या बाबत खात्री करुन वाहन विभागाने इंधन पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र.:-३०५** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./५५५/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा दि.०४/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जुने बसस्थानक नव्याने बांधलेले आधुनिक वातानुकूलित सार्वजनिक शौचालय पे अॅण्ड युज तत्वावर चालविणे कामी स्वच्छता दुत बचत गट,जळगांव संस्थेस सुरक्षा अनामत सुट देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जुने बसस्थानक नव्याने बांधलेले आधुनिक वातानुकूलित सार्वजनिक शौचालय पे अॅण्ड युज तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणे करिता स्वच्छता दुत बचत गट,जळगांव यांचे सर्वाधिक स्वामित्व शुल्क दर ११% प्रमाणे रु.६,९३०/- प्रतीमहा या दरास स्थायी समिती / प्रशासक ठराव क्रं.२८० दि.११/०७/२०२५ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने स्वच्छता दुत बचत गट,जळगांव यांना सुरक्षा अनामत रक्कम रु.१,६५,०००/- भरणेस इकडील जा.क्र./४१३/२०२५-२६ दि.२८/०७/२०२५ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार स्वच्छता दुत बचत गट,जळगांव यांनी दि.०५/०८/२०२५ रोजी पत्र दिलेले असून सदर पत्रासोबत परिपत्रक क्रं.नपप्रसं/१३/पणन सहाय्य/२००४/प्र.क्र.१०९७, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई-३० दि.२१ डिसेंबर २००४ मधील पान क्रं.४७ वर अ) महानगरपालिका / नगरपरिषदाच्या इतर निविदा प्रक्रियेत सहभागी झाले तर, अशा गटांना अनामत रक्कम भरण्यातून सुट देण्यात यावी असे नमुद असून सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास सुट मिळण्याची विनंती केलेली आहे.

सदर परिपत्रक क्रं.नपप्रसं/१३/पणन सहाय्य/२००४/प्र.क्र.१०९७, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई-३० दि.२१ डिसेंबर २००४ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ (संविदा) च्या २ (२) नुसार महानगरपालिकेच्या समितीने / महासभेने मान्यता दयावी असे नमुद आहे. करिता स्वच्छता दुत बचत गट,जळगांव यांना रक्कम रु.१,६५,०००/- सुरक्षा अनामत सुट देणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०९** **प्रशासक ठराव क्र.:-३०६** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा/विदयुत/२१७/२०२५-२६ दि.१६/०९/२०२५
३. विदयुत विभाग प्रमुख यांचा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा अभिप्राय.
५. निविदा समितीचा निर्णय
६. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२८/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे टी.बी. सॅनीटोरिअम हॉस्पिटल येथे ई-बस चार्जिंग स्टेशन कामी बस डेपो कार्यालय व परिसरात विदयुत संबंधीचे कामे करणे.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे टी.बी. सॅनीटोरिअम हॉस्पिटल येथे ई-बस चार्जिंग स्टेशन कामी बस डेपो कार्यालय व परिसरात विदयुत संबंधीचे कामे करणे कामी आयुक्त यांची दि.१६/०७/२०२४ रोजीच्या मान्यतेने शासनाचे https:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना क्रं. ०८ प्रसिध्द करण्यात आली. त्याबाबतचे माहितीपत्रक दै. पुण्य नगरी दि. २८/०१/२०२५ रोजीचे वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले. संगणकाद्वारे ई-निविदा भरणे करीता दि. २७/०१/२०२५ ते दि.०३/०२/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर मुदतीत संगणकाद्वारे https:/mahatenders gov.in वर १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ, २) ईटामॅक्स इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्ट्रर ॲण्ड सप्लायर्स,जळगांव ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. दोनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने उघडण्यात आले. दोनही ई-निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता ई- निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ, यांनी फोल्डर क्रं.१ मध्ये आवश्यक असलेली/ मागणी केलेली कागदपत्रे जोडलेली असल्याने ते पात्र ठरले. मात्र दुसरे ई-निविदाधारक ईटामॅक्स इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्ट्रर ॲण्ड सप्लायर्स,जळगांव यांनी फोल्डर क्रं.१ मध्ये आवश्यक असलेली/ मागणी केलेली कागदपत्रे जोडलेली नसल्याने ते अपात्र ठरले.

ई-निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टीने शासनाचे https:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर फेर ई-निविदा सुचना (२nd call) क्रं. ०९ प्रसिध्द करण्यात आली. त्याबाबतचे माहितीपत्रक दै. पुण्य नगरी दि. १७/०४/२०२५ रोजीचे वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले. संगणकाद्वारे ई-निविदा भरणे करीता दि. १६/०४/२०२५ ते दि.२२/०४/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

सदर मुदतीत संगणकाद्वारे https:/mahatenders gov.in वर १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ, २) लक्ष्मी एंटरप्रायजेस,नाशिक, ३) श्रीराम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,जामनेर या तिन ई-निविदाधारकांचे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तिनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने उघडण्यात आले. त्यात आलेल्या तिनही ई-निविदाधारकांची फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता ई-निविदेत सहभागी असलेले तिनही ई-निविदाधारकांनी फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रे सादर केलेली नसल्याने ई-निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने तिनही ई-निविदाधारक यांना निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची कागदपत्रे दोन दिवसात सादर करणेबाबत दि. ०९/०६/२०२५ रोजी https:/mahatenders gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि. १२/०६/२०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत Short Fall Document Submission करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ई-निविदाधारक १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांनी Short Fall द्वारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते सदर ई-निविदेकरीता पात्र ठरले. २) लक्ष्मी एंटरप्रायजेस,नाशिक व ३) श्रीराम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,जामनेर यांनी Short Fall द्वारे निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने दोनही ई-निविदाधारक सदर ई-निविदेकरीता अपात्र ठरले.

ई-निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टीने सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने फेर ई-निविदा सुचना क्रं. १० (३rd call) शासनाचे https:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. व त्या बाबतचे माहिती पत्रक दै. सकाळ दि. २५/०६/२०२५ रोजी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले होते. संगणकाद्वारे ई-निविदा भरणेकरीता दि. २४/०६/२०२५ ते दि. ०१/०७/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

सदर मुदतीत संगणकाद्वारे https:/mahatenders gov.in वर १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ २) लक्ष्मी एंटरप्रायजेस,नाशिक ३) मार्वल इलेक्ट्रिकल्स अँड सोल्युशन्स,भुसावळ या तिन ई-निविदाधारकांचे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तिनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने उघडण्यात आले. त्यात आलेल्या तिनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता ई-निविदेत सहभागी असलेले तिनही ई-निविदाधारकांनी फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नसल्याने ई-निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने तिनही ई-निविदाधारक यांना निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची कागदपत्रे दोन दिवसात सादर करणेबाबत दि.१०/०७/२०२५ रोजी https:/mahatenders gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि. १४/०७/२०२५ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत Short Fall Document Submission करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने ई.निविदाधारक यांनी Short Fall द्वारे खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

| अ.क्रं. | ई-निविदाधारकाचे नांव | ई-निविदाधारक यांना Short Fall द्वारें मागणी केलेली कागदपत्रे | ई-निविदाधारक यांनी Short Fall द्वारें सादर केलेली कागदपत्रे | पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | **लक्ष्मी एंटरप्रायजेस,नाशिक** | १.SIMILAR TYPE OF WORK i.e. (year २०१९-२० to २०२३-२४)<br>Three works -४०% at २०२३-२४ pricelevel,<br>Two works - ५०% at २०२३-२४ price level ,<br>One work- ८०% at २०२३-२४ price level<br>२.TURN OVER CERTIFICATE<br>३.BID CAPACITY | १.SIMILAR TYPE OF WORK i.e. (year २०१९-२० to २०२३-२४) सादर केलेले नाही.<br>२.TURN OVER CERTIFICATE ) सादर केलेले आहे<br>३.BID CAPACITY ) सादर केलेले आहे. | अपात्र |
| २ | **सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ** | १. PAN CARD<br>२. TURNOVER CERTIFICATE (YEAR २०१९-२० TO २०२३-२४) | १. PAN CARD ) सादर केलेले आहे.<br>२. TURNOVER CERTIFICATE (YEAR २०१९-२० TO २०२३-२४) ) सादर केलेले आहे. | पात्र |
| ३ | **मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ** | १.EPF CHALLAN OF LAST THREE MONTHS<br>२.TURNOVER CERTIFICATE (YEAR २०१९-२० TO २०२३-२४) | १.EPF CHALLAN OF LAST THREE MONTHS ) सादर केलेले आहे.<br>२.TURNOVER CERTIFICATE (YEAR २०१९-२० TO २०२३-२४) ) सादर केलेले आहे. | पात्र |

वर नमुद तक्ता पाहता ई-निविदाधारक **लक्ष्मी एंटरप्रायजेस,नाशिक** यांनी Short Fall द्वारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने सदर ई-निविदेकरीता ते अपात्र ठरत आहेत. १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ, २) मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ यांनी Short Fall द्वारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते सदर ई-निविदेकरीता पात्र ठरत आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदा संदर्भातील दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदींबाबत स्पष्टीकरण महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं. सीएसटी -२०१७/प्र. क्रं.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ नुसार याच शासन निर्णयातील परिच्छेद ४.३ व परिच्छेद ४.४ मधील तरतुदींबाबत विसंगती दुर करण्यात येत असून परिच्छेद ४.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार लिफाफा क्रं.२ (आर्थिक देकार) उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रथम बोलीवेळी प्राप्त निविदांमध्ये तीन पात्र निविदा असण्याची आवश्यकता नाही.**

करिता सदर ई-निविदेत सहभागी ई-निविदाधारक १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ २) मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ या निविदाधारकांनी फोल्डर क्रं.१ (तांत्रिक कागद पत्रांचा) मध्ये आवश्यक असलेले कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते पात्र ठरत असल्याने १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ २) मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ या निविदाधारकांचे फोल्डर क्रं.२ (दराबाबतचा) उघडणेस निविदा समितीची सर्वानुमते मान्यता प्राप्त झालेली आहे.

करिता दोन निविदाधारक १) सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ २) मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ या निविदाधारकांचे फोल्डर क्रं.२ (दराबाबतचा लिफाफा) निविदा समितीच्या मान्यतेने उघडण्यात आले. त्यात आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | ई निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम | ई-निविदेत आलेले दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ | रु.३७,०४,५१८/- | ११.२००%कमीचे रु.३२८९६११ =९८४ | रु.३२,८९,६१२ |
| २ | मार्वल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड सोलुशन्स, भुसावळ | | ई निविदेतील दराप्रमाणे रु.३७०४५१८=०० | रु. ३७,०४,५१८ |

वर नमुद तुलनात्मक तक्ता पाहता ई- निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे निविदा रक्कमेपेक्षा ११.२००% कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३२,८९,६१२/- मात्र इतका खर्च ई निविदा प्रमाणे आहे. परंतु ई निविदेत नमुद केलेप्रमाणे आलेल्या दरानुसार GST या रक्कमेचा खालीलप्रमाणे समावेश करावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदेप्रमाणे अपेक्षित खर्च | रु.३२,८९,६१२/- |
| २ | GST १८% | रु.५,९२,१३०/- |
| | एकुण अपेक्षित खर्च | रु.३८,८१,७४२/- |

वर नमुदप्रमाणे निविदेत आलेल्या दरानुसार व GST सह अपेक्षित खर्च रक्कम रु. ३८,८१,७४२/-मात्र इतका आहे. परंतु निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांचे ई निविदा रक्कमेपेक्षा ११.२००% कमीचे दर आलेले असल्याने शासन निर्णय क्रं. सीएटी/२०१७/प्र. क्रं./०८/ईमा-२ मंत्रालय मुंबई ३२ दि.२७/९/२०१८ मधील परिच्छेद क्रं.४-६-३ मध्ये नमुद तरतुदीनुसार व निविदा अटीशर्तीनुसार मक्तेदार यांचेकडून १ ते १०% कमीच्या दरापर्यंत १ % व त्यावरील प्रत्येक टक्क्यास १ % याप्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरिटी डी.डी. सादर करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने ई-निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांनी ई निविदेत निविदा रक्कमेच्या ११.२००% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्याकडुन ३ % परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून अनामत रक्कम रु.१,१६,४५२/- मात्रचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. मनपा खजिन्यात सादर करणे करीता ई निविदाधारक यांना मनपा/विद्युत/१८० दि. १२/०८/२०२५ रोजीचे शहर अभियंता यांचे स्वाक्षरीचे पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने ई-निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांनी मुदतीत मनपा पावती क्रं. ४१०१ दि.१४/०८/२०२५ रोजी रक्कम रु. १,१६,४५२/- मात्रचा डी.डी. क्रं. २४१६०९ दि. १३/०८/२०२५ अन्वये मनपा खजिन्यात जमा केलेला आहे. सदर कामी वर नमुद केलेप्रमाणे निविदेत आलेले दरात शासकीय कर समाविष्ट करुन एकुण रक्कम रु.३८,८१,७४२/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. सदर कामाचा खर्च हा केंद्र पुरस्कृत पी.एम.ई. बस सेवा योजने अंतर्गत करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने ई निविदाधारक सत्यम इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनियर्स,भुसावळ यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११.२००% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ चे कलम ७३ (क) नुसार स्थायी समिती तथा प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र.:-३०७** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/विधी शाखा/७०/२०२५ दि.१६/०९/२०२५
३. विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचा दि.०३/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०२/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. उपायुक्त यांचा दि.०८/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च् न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालय,मा.औद्योगिक न्यायालय,मा.कामगार न्यायालयात महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडणेकरीता कार्यरत विधीज्ञ पॅनलला मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत .

---

वाचा क्र.१ व विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ज.श.म.न.पा. विधीज्ञ पॅनलची नियुक्ती म.स्थायी समिती ठराव क्र.१४७, दि.२९/०७/२०१९ अन्वये दि.०६/०९/२०१९ पासून पाच वर्षाकरिता करण्यात आलेली होती. त्यात वेळोवेळी मुदतवाढ देत सन-२०२४ मध्ये एक वर्षाकरिता दिलेल्या मुदतवाढीत विधीज्ञ पॅनल वरील नियुक्त ४६ विधीज्ञांपैकी १९ विधीज्ञांनी पॅनलवर काम करण्याकरिता करारनामा करुन दिलेला होता. तसेच दि.०६/०९/२०२४ ते दि.०६/०९/२०२५ या एक वर्षाच्या मुदतवाढ दिलेल्या कालावधीत १९ विधीज्ञ कार्यरत होते. आजमितीस जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ, सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे अनुक्रमे दहा , सात , दोन असे एकूण एकोणावीस विधीज्ञ कामकाज पाहत आहे.

तसेच उक्त नमुद प्रमाणे विधीज्ञ पॅनल वरील नियुक्त करण्यात आलेले ४६ विधीज्ञ खालील प्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली | | |
| १ | ॲड. सुहास कदम | दिल्ली |
| २ | ॲड. प्रशांत एस. केंजाळे | दिल्ली |
| ३ | ॲड. शिवाजी जाधव | दिल्ली |
| मा.उच्च न्यायालय खंडपीठ , औरंगाबाद | | |
| १ | (ॲड. सुशीलकुमार हेमंतकुमार त्रिपाठी)<br>ॲड . राजेंद्र दायमा | औरंगाबाद |
| २ | (ॲड. विजय. बी. पाटील)<br>ॲड . श्रीकांत पाटील | औरंगाबाद |
| ३ | ॲड. संदेश. आर. पाटील | औरंगाबाद |
| ४ | ॲड. सचिन बाळासाहेब मुंडे | औरंगाबाद |
| ५ | ॲड. व्ही. डी. गुनाले | औरंगाबाद |
| ६ | ॲड. लक्ष्मण विष्णु संगीत | औरंगाबाद |
| ७ | ॲड. मेहुल नावंदर | औरंगाबाद |
| मा.जिल्हा व सत्र न्यायालय , जळगांव | | |
| १ | ॲड. आनंद. एस. मुजुमदार | जळगांव |
| २ | ॲड. गजेंद्र यशवंतराव पाटील | जळगांव |
| ३ | ॲड. विक्रम उत्तम देवराज | जळगांव |
| ४ | ॲड. सुरेंद्र . जी. काबरा | जळगांव |
| ५ | ॲड. छाया . आर. सपके | जळगांव |

| | | |
|---|---|---|
| ६ | ॲड. धिरज अशोक पाटील | जळगांव |
| ७ | ॲड. दिपकराज सोपान खडके | जळगांव |
| ८ | ॲड. व्ही. एम. पाटील | जळगांव |
| ९ | ॲड. जयंत तुळशीदास कुरकुरे | जळगांव |
| १० | ॲड. सतिश रघुनाथ चव्हाण | जळगांव |
| ११ | ॲड. महेश रघुनाथ भोकरीकर | जळगांव |
| १२ | ॲड. तुळशीराम पंडीत नेमाडे | जळगांव |
| १३ | ॲड. दर्शन बी. देशमुख | जळगांव |
| १४ | ॲड. स्वप्निल विजयसिंग पाटील | जळगांव |
| १५ | ॲड.टी.आर. पाटील | जळगांव |
| १६ | ॲड. ज्योती सुनील भोळे | जळगांव |
| १७ | ॲड. सुनील रघुनाथ बागुल | जळगांव |
| १८ | ॲड. अमित एस. सोनवणे | जळगांव |
| १९ | ॲड. प्रदीप शांताराम सोपारकर | जळगांव |
| २० | ॲड. मिलींद पंढरीनाथ बडगुजर | जळगांव |
| २१ | ॲड. वसंत समाधान भोलाणकर | जळगांव |
| २२ | ॲड. केतन जयदेव ढाके | जळगांव |
| २३ | ॲड. रणजितसिंग के. पाटील | जळगांव |
| २४ | ॲड. सुभाष रामदास तायडे | जळगांव |
| २५ | ॲड. दिलीपकुमार भगवानदास मंडोरे | जळगांव |
| २६ | ॲड. रमाकांत सोनवणे | जळगांव |
| २७ | ॲड. विलास मानसिंग पाटील | जळगांव |
| २८ | ॲड. अनिल सुर्याजी पाटील | जळगांव |
| २९ | ॲड. राजेंद्र काशिनाथ पन्हाळे | जळगांव |
| ३० | ॲड. आनंदा रामकृष्ण सरोदे | जळगांव |
| ३१ | ॲड. सारंग कुलकर्णी | जळगांव |
| ३२ | ॲड. जयंत भाऊराव मोरे | जळगांव |
| ३३ | ॲड. विजय एस. शिंदे | जळगांव |
| ३४ | ॲड. अशोक जगन्नाथ महाजन | जळगांव |
| ३५ | ॲड. स्वप्नील एस. कुलकर्णी | जळगांव |
| ३६ | ॲड. नरेंद्र पुंजु पाटील | जळगांव |

उक्त नमुद तक्त्यातील मा.उच्च न्यायालय , खंडपीठ औरंगाबाद येथील विधीज्ञ ॲड . सुशिलकुमार त्रिपाठी व ॲड. विजय बी. पाटील यांचे जागी अनुक्रमे ॲड. राजेंद्र दायमा व ॲड . श्रीकांत पाटील यांची नव्याने नेमणुक करण्यात आलेली आहे.

उपरोक्त विधीज्ञ तसेच प्रमुख विधी सल्लागार यांची मुदत दि.०६/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सदयास्थितीत जळगांव शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ ची प्रक्रीया सुरु झालेली आहे. अशा परिस्थितीत नविन विधीज्ञ पॅनल व प्रमुख विधी सल्लागार यांची विहीत कार्यपध्दतीने नियुक्ती देणेस विलंब होणार असल्याने आणि आयुक्त तथा प्रशासक यांनी त्यांचेसोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार ज्या विधीज्ञांकडे विविध दावे / पिटीशन सुरु आहेत व त्यांच्याकडील काही दाव्यात निकाल लागलेला असून काही न्यायप्रविष्ट असल्याने उक्त नमुद यादीतील विधीज्ञ व प्रमुख विधी सल्लागार यांना विहीत कार्यपध्दती नुसार प्रक्रीया पुर्ण होईपावेतो १ वर्षा करीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच एखादया विशिष्ट दावा / पिटीशन मध्ये सिनीयर / स्पेशल कौन्सील नेमण्याची आवश्यकता भासल्यास नेमणूकीचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता मिळण्यासाठी विधी शाखा प्रमुख, विधी विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमुद यादीतील विधीज्ञ यांना विहीत कार्यपध्दती नुसार प्रक्रीया पुर्ण होईपावेतो १ वर्षा करीता मुदतवाढ देणेस तसेच प्रमुख विधी सल्लागार यांना यापूर्वी किती मानधन दिले जात होते यासह प्रमुख विधी सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी प्रस्ताव फेर सादर करणेस वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-११** **प्रशासक ठराव क्र.:-३०८** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/६७४/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. प्रशासन अधिकारी,मनपा शिक्षण विभाग यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मिळकत व्यवस्थापक यांचा दि.२९/०७/२०२५ चा अभियप्राय.
६. उपायुक्त (महसुल) यांचा दि.०४/०८/२०२५ चा अभिप्राय.
७. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१४/०७/२०२५ चा अभिप्राय
८. आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका शाळा क्रं.२४ खेडी बु (कै.दादासाहेब भिमराव वाल्मीकराव देशमुख) शाळेच्या इमारतीच्या जिर्ण झालेल्या खोल्या पाडणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

कै.दादासाहेब भिमराव वाल्मीकराव देशमुख मनपा जळगांव शाळा क्रं.२४ खेडी बु जळगांव येथील बंद स्थितीतील २ वर्ग खोल्या व आऊट हाऊस जिर्ण व धोकादायक स्थितीत असल्याने ते निष्कासीत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ (३) नुसार मोडकळीस आलेल्या किंवा पडण्याच्या बेतात असलेल्या अशा बांधकामापासुन धोका आहे असे वाटत असेल तर त्यास पूर्वोक्त नोटीस देण्यापूर्वी किंवा नोटीशीची मुदत संपण्यापुर्वी उक्त बांधकामास कुंपण घालता येईल ते पाडता येईल मजबुत करता येईल किंवा दुरुस्त करता येईल किंवा धोका टाळण्यासाठी आावश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील किंवा आवश्यक असेल असे काम करुन घेता येईल अशी तरतूद आहे.

मनपा शाळा क्रं.२४ खेडी बु चे मुख्याध्यापक, प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांचे मागणी नूसार व प्रत्यक्षात जागेवरील वस्तुस्थिती विचारात घेता सदर इमारत धोकेदायक स्थितीत असल्याने विदयार्थी हितासाठी प्रस्तुतचे बांधकाम दुरुस्त अथवा मजबुत करण्यासारखे नाही त्यामुळे ते पाडुन टाकणे आवश्यक आहे. त्यानुसार उक्त अधिनियमात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार सक्षम प्राधिकरण / अधिकार आयुक्त यांना असल्याने त्यानुसार प्रशासक / महासभेची मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.५३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-१२** **प्रशासक ठराव क्र.:-३०९** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा** :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७६/ दि.१८/०८/२०२५ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१४ अंतर्गत गट नं.४१६/१/२ राधेश्याम कॉलनी मनपा ओपनस्पेस सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार पंकज गजानन वाघ यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९९,६४५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७७/ दि.२५/०८/२०२५ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान २०२४-२५ योजने अंतर्गत प्रभाग क्रं.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.१५२/४/१+२ डिंगबर हौसिंग सोसायटी परिसर येथे उदयान विकसित करणे कामी मक्तेदार हेमंत अरुण नाईक यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९०% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१९,७६,०५५/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.३१/पा.पु./ दि.१८/०८/२०२५ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथील २० किलो डोस असणारे गॅस क्लोरीन प्लांट वार्षिक स्वरुपात दुरुस्ती करणे कामी मक्तेदार डी'क्लोरिएंट सिस्टम प्रा.लि,पुणे यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.२,७०,००/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.३२/पा.पु./ दि.१८/०८/२०२५ अन्वये प्रभाग क्र.०७,१०,११ मध्ये व्हॉलची उघड / झाप करणे करिता व्हॉल चाबी बनविणे कामी मक्तेदार मे.मॅगनम इंजिनिअरिंग वर्क्स,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.५७,९३८/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.३३/पा.पु./ दि.१८/०८/२०२५ अन्वये भाऊंचे उदयान येथील जुना उंच जलकुंभ भरण्यासाठी डि.एस.पी. पंपिंग स्टेशनवर भरणे करिता रायझिंग मेनसाठी एम.एस.पाईप, व्हॉल आवश्यक साहित्य पुरविणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,९६,५९६/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.३४/पा.पु./ दि.१८/०८/२०२५ अन्वये बालगंधर्व नाटयगृह येथे पाणी पुरवठा कामी १००० लिटर्स पाण्याची टाकी बसविणे कामी मक्तेदार प्रशांत एंटरप्राईजेस,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.१३,६८७/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.३५/पा.पु./ दि.२६/०८/२०२५ अन्वये पाणी पुरवठा विभागात विविध ठिकाणी होणाऱ्या अमृत गळती करिता रस्ता खोदणे सीमेंट रस्ता फोडणे डांबरी रस्ता खोदणे कामी JCB तासिका तत्वावर भाडेने लावणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील लीलाधर फेगडे,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,६४,३०७/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.३६/पा.पु./ दि.२६/०८/२०२५ अन्वये झोन क्र.१० अंतर्गत चौघुले प्लॉट ते बिंदुबाई हॉल पर्यंत २२५ मीमी व १८० मीमी व्यासाची नवीन HDPE पाईपलाईन टाकणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील लीलाधर फेगडे,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.८,५४,५३२/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.३७/पा.पु./ दि.२८/०८/२०२५ अन्वये पा.पु.झोन क्र.१ शिवाजी नगर मध्ये पा.पु.व्यवस्था व दुरुस्ती कामी विविध साईजचे साहित्य पुरविणे कामी मक्तेदार प्रशांत एंटरप्राईजेस,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.४६,२००/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.३८/पा.पु./ दि.०३/०९/२०२५ अन्वये प्रभागात अमृत योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिन्यांवरील स्लुस व्हॉल करीता चेंबर्स बांधणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,७७,९२४/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.३९/पा.पु./ दि.११/०९/२०२५ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथील रिसऱ्कयूलेशन संप व फ्लॅश मिक्सर मधिल गाळ काढणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.२,९८,१०८/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**